**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**,
*Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.48612, OCT- NOV 2017, VOL- 4/24*

# आदिवासींच्या जीवन पध्दतीचा सर्वकष विश्लेषण

**गीता शिंदे, Ph. D. & माधुरी इसावे, Ph. D. & इंदिरा शिंपी**

***Abstract***

*मध्यप्रदेश, महाराष्ट्र व गुजरात यांच्या मध्ये असणाऱ्या नंदूरबार जिल्हयाला तापी व नर्मदा या नद्या, सातपुडयाच्या दुर्गम डोंगर कपारीत रहाणाऱ्या आदिवासी लोकांचे जीवन अतिशय कष्टप्रद व दारिद्रयाशी कायम संघर्ष करणाऱ्या आदिवासींना देखील आता नव्या युगाची ओळख हळूहळू व्हायला लागली आहे. आपल्या हक्कासाठी ते आता सज्ज झाले आहेत. वास्तविक आदिवासींच्या काही चालिरीती अतिशय चांगलया व सहजसोप्या आहेत, ज्या शहरवासीय लोकांना त्यांचे काही गुण आत्मसात करणे जरुर आहे. आदिवासी संस्कृति आणि प्राचीन १२व्या शतकांपासून ते ब्रिटिशांशी त्यांचे हल्ले झाले आहेत, तसेच मराठेशाहीत त्यांनी आपली लढवैय्यी वृत्ती सोडली नाही. आपल्या परंपरागत चालत आलेल्या जमीन हक्काबद्दल ते अतिशय जागरुक आहेत.*

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्तावना:—**

आदिवासींच्या प्रमुख पावरा, भिल्ल, भावची, कारकू अशा जाती उपजाती प्रामुख्याने फक्त नंदूरबार जिल्हयातच पहावयास मिळतात. तेथील लोकांची भाषा त्याला स्थानिक दर्जा आहे. त्या भाषेला लिखित स्वरुपाची लिपी स्वतंत्र नाही. मौखिक स्वरुपातच त्याचा प्रचार आणि प्रसार झाला आहे. संशोधिका ज्यावेळी तेथील प्रदेशात संशोधन अभ्यास करण्यास गेल्या असताना तेथील भाषा अजिबात कळत नव्हती. संशोधिकेने आपली स्वत:ची चार वाक्ये, त्यांच्या निरनिराळया बोली भाषेत त्यांच्याकडून लिहावयास सांगितले. त्यांच्या उच्चारासह लिहावयास सांगितले.

ती वाक्ये खालीलप्रमाणे

१. मी तुमच्या गावात आले.

२. मी आपल्या आदिवासींवर संशोधन करते.

३. माझे नाव शिंपी आहे.

४. मी पुण्याला रहाते.

वरील वाक्यांचे रुपांतर त्यांच्या भाषेत खाली दिलेले आहे.

मावची भाषा

१. आय तुमे गावास येती.

२. आय तुमे आदिवासी वे संशोधन कोअंहू

३. मा नाव शिंपी हेय.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

४. आय पुना में राहू.

भिल्ल भाषा

१. आय तुमा भाव होय.

२. आय आपा आदिवासी संशोधन कहो.

३. मा नाव शिंपी होय.

४. आय पुनाम रहो.

पावरा भाषा

१. मी तुमरा गावमा आवनी.

२. मी आपनी आदिवासीपर संशोधन करणी से.

३. माझे नाव शिंपी से.

४. मी पुनाम रयतली.

वरील सर्व बोली भाषेत गुजराती, मारवाडी, अहिराणी, हिंदी, मराठी या भाषेतील शब्दांची सरमिसळ होऊन नवीन भाषा उदयास आली. याला कारण या राज्याच्या अवतीभोवती गुजरात, मध्यप्रदेश व महाराष्ट्र, धुळे जिल्हयांचे भौगोलिक स्वरुप आणि तेथील राज्याचे भाषेतील शब्द यांचे आदिवासींच्या भाषेच्या देवाणघेवाणीचे व्यवहारिक शब्द आपोआप वाणीतून उच्चारले जातात. असे नेहमीचे अनुकरण झाले की, आदिवासींची एक नवी भाषा तयार होते. त्यात देखील शब्दांची समानता असल्यामुळे राष्ट्रीय एकात्मता व भौगोलिक सीमा ओलांडल्याचे परिवर्तन पहावयास मिळते.

खऱ्या अर्थाने आधनिक संस्कृति

आदिवासींचे सामाजिक जीवन अगदी साधे व सरळसोपे आहेत. मुलीला लग्नात वरपक्षाकडून वधूपक्षाला मोबदला दिला जातो. बहुतेक विवाह मार्च—मे महिन्यात होतात. विवाहापूर्वी मुलीला दिवस गेले असल्यास विवाह समारंभात थोडा फरक असतो. कुमारी माता किवां विधवा आपल्या दिराशी विवाह करते. लग्न मात्र फार थाटामाटात केले जाते. लग्नात भगताला मोठे स्थान असते. विवाहच्या मनोरंजक पध्दती आहेत. भगत वधू—वरांना उत्तम आशिर्वाद व भावी आयुष्य उत्तम रहाण्याकरिता उपदेश—सल्ला देतात. जर वधू—वरात सामंजस्य झाले नाही तर पंचायतीसमोर त्यांचा निवडा होतो. वधू मुल्य वसूल केले जाते. घटस्फोट घेतला जातो. कोर्ट—कचेऱ्या हेलपाटे होत नाही. मुला—मुलींना आपला जोडीदार निवडण्याचा पूर्व अधिकार असतो. त्या समाजात कोणीही विधूर किंवा विधवा एकाकी जीवन व्यतीत करीत नाहीत. प्रत्येकाला आपला साथी सहचर असतो. आदिवासी लोक मुलगी झाल्याचा उत्सव साजरा करतात. स्त्री—भ्रुण हत्या किंवा बायकोवर

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

अत्याचार त्यांचेकडे होत नाही. प्राकृतिक निसर्गकन्या या रंगाने काळया असल्या तरी नीटस् रेखीव व आकर्षक असतात.

विवाहानंतर लवकर पहिले मूल होणे शिक्षित समाजातसुध्दा महत्वाचे असते. दोन मुलांमधील अंतराचे महत्व आदिवासींना चांगले माहित असते. त्याचप्रमाणे शरीरसंबंध ठेवण्यासंबंधीची त्यांचे नियम कुटुंब नियोजनाला पूरक आहेत. अशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांच्या परंपरा किती समजाहिताच्या आणि सशक्त आहेत हे कळल्यानंतर आश्चर्यच वाटते. अशा प्रकारच्या काही गुण आपल्या शहरातील शिक्षित समाजाने देखील अनुकरण करण्यास काहीच हरकत नाही.

हळू—हळू आदिवासी समाजात सावकाशपणे पण निश्चित स्वरुपात क्रांती होत आहे. आपल्या स्वाभाविक हक्कांसाठी त्या लढा देत आहे. नव्या युगाचे वारे त्यांच्यापर्यंत हळूहळू पसरत आहे.

१२ सप्टेंबर २०१७च्या 'सकाळ' या वृत्तपत्रात सचित्र एक बातमी आली होती — नाव झिलाबाई, वय केवळ ८९ वर्षे, दिसायला अत्यंत बारीक, पण अंगात कमालीची उर्जा, जणू ''झाशीची राणीच''. आपल्या बांधवांवर अन्याय होत आहे म्हणून त्यांनी आवाज उठविला होता. समाजबांधवांना एकत्र केले आणि एकत्रित प्रयत्नातून अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केलाच, शिवाय निवाऱ्या सारखा प्रश्नही सोडवला. ही धडपड ''आमो आखा एक से'' ''हम सब एक है'' या लघुपटातून नुकतीच उलगडली.

स्वार्तंत्र्य मिळाले, आम्हाला काय मिळाले अशी घोषणा देत आपल्या प्रश्नांकडे आदिवासी लक्ष वेधून घेतात. पण त्यांच्या समस्या अजूनही सुटल्या नाहीत म्हणून आदिवासींचा जीवन संघर्ष आणि झिलाबाई यांच्या जीवनावर आधारित हा लघुपट प्रतिभा शर्मा यांनी दिग्ददर्शित केला आहे. तो राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात प्रर्दिशित करण्यात आला. यावेळी स्वत: झिलाबाई, अभिनेत यशपाल शर्मा, आयोजक भटेवरा उपस्थित होते.

नंदूरबार येथील तळोदा अशा डोंगरी भागातील आदिवासींच्या जीवन प्रवास या लघुपटात दाखविण्यात आला. झिलाबाई या पहिल्या आदिवासी आंदोलक आहेत. आदिवासी लोकांचा घराचा प्रश्न सोडविण्यासाठी त्या लढल्या. आदिवासींना त्यांच्या हक्काची जमीन मिळत नाही.

लघुपटाची 'न्यूयॉर्क इंटनॅशनल फिल्म फेस्टिव्हल' मध्ये निवड झाली आहे.

आदिवासीं समाजामध्ये पूर्वपार चालत आलेल्या रुढी परंपरा आज २१ व्या शतकातही तशाच उत्साहाने होतात. रेवा (नर्मदा) आणि तापी या नद्यांच्या मध्यवर्ती सातपुडा पर्वत रांगातील चौथ्या रांगेत 'काठी' हा गाव आहे. काठी संस्थान पाडवी घराण्याचे आहे. या संस्थानचे राजे मानसिंग पाडवी, रणजित सिंग पाडवी, बहादूर सिंग पाडवी, दिग्विजय सिंग पाडवी, राजेंद्रसिंग पाडवी, 'काठी' संस्थानिकांच्या नोंदीनुसार सन १२४६ पासून संस्थान बरखास्त होईपर्यंत सोळा राजे झाले आहेत. काही येथील राजवडी दसरा राजे उमेदसिंग सरकार यांनी सुरु केला.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

दसरा साजरा करण्याच्या पध्दतीनुसार पारंपारिक गाव पुजारा, पोलीस पाटील, राजघरण्यातील व्यक्ति दसरा सणाच्या दहा दिवस आधी कालपासाहा (भूमंडळाचा प्रमुख) पूजा करतातत. नवव्या दिवशी (नवीन वस्तू, धान्य ग्रहण करणे) पूजन केले जाते. हे पूजन ज्या ठिाकणी केले जाते ती जागा गायीच्या शेणाने सारवली जाते. त्यानंतर पूजन होते. पूजन केल्यानंतर गायीच्या शेणाचा व भाताचा टिळा लावला जातो. ही प्रथा आजही सुरु आहे.

दसऱ्याच्या दिवशी अश्वशर्यती होतात. गुजरात व मध्यप्रदेशातील अश्वमालक या स्पर्धेत सहभागी होतात. दहा वर्षीय बालकापासून वयोवृध्द व्यक्ती अश्वस्वार होतात. जो घोडा शेवटच्या फेरीपर्यंत टिकतो त्याला विजेता घोषित करण्यात येते. १२ व्या शतकापासून चालत आलेली ही परंपरा २१ व्या शतकातही सुरु आहे. त्यासाठी नियोजनाकरिता राजपाठा मित्र मंडळ सहकार्य करीत आहे.

आदिवासींच्या वृत्तपत्रातील अधूनमधून येणाऱ्या बातमीने त्यांचा आक्रोश, त्यांच्या मागण्या, दैनंदिन गरजा, रोजगारीचा प्रश्न इ. त्यांच्या जगण्याच्या अस्तित्वालाच धक्का देणाऱ्या असतात. त्यांची पण भविष्यातील उत्तम स्वप्ने असतात, पण त्याचा मागोवा कुणीच घेत नाही. नेहमी हाल—अपेष्टात जगणारा, दारिद्रयाने खचलेला असाच आदिवासी पहावयास मिळतो. नुकतीच दि. २० नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळ वृत्तपत्रामधील बातमी अशी होती, 'उपचाराअभावी महिलेचा झोळीत अखेरचा श्वास' — कर्जत तालुका. पक्का रस्ता नसल्याने गावापर्यंत (इस्पितळापर्यंत) पक्का रस्ता नसल्याने त्यामुळे गावात कोणतेही वाहन येत नसल्यामुळे कुटुंबियापुढे पेच निर्माण झाला. अखेर सदर महिलेला उपचारासाठी चादरीच्या झोळीतून बीड बुद्रुकपर्यंत घेवून जाण्याचा निर्णय झाला. परंतू एक किलोमीटरच्या अंतरादरम्यान तिने अखेरचा श्वास घेतला. वेळेवर उपचार न झाल्याने रायगड जिल्हयातील दुर्गम वाडयावरील रस्त्यांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

अशा प्रकारच्या अनेक ह्दयद्रावक घटना वृत्तपत्रात अधून—मधून येतात. मन विषण्ण होते— वाटते! केव्हा संपणार आदिवासींचा वनवास !

**संदर्भ :—**

*गारे गोविंद,(१९५४) सहयाद्रीतीय आदिवासी महादेव कोळी पहिल आवृत्ती*
*गारे गोविंद,(१९७५) भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती,पुणे आदिम*
*जोशी लक्ष्मणशास्त्री, (१९७२) वैदिक संस्कृतीचा विकास दुसरी आवृत्ती.प्राज्ञ पाठाशाळा मंडळ,वाई पृष्ठ ४४—४५.*
*मुळे,रा.शं.व. उमाठे वि.तु.(१९७८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपुर,महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.*
*माने लक्ष्मण(१९९७) विमुक्तायन,प्रथम आवृत्ती,यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठानगर, मुंबई, पृष्ठ क्र.२.*
*शिरोळे धैर्यशील (२००२)— आदिवासी कथा व व्यथा,स्नेहवर्धन प्रकाशन,द्वितीय आवृत्ती, पुणे.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*